ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख १८ मे, १९६० अंक २०

## विविध माहिती

**कारकुनाच्या जागांसाठी धडपड**—१९५९ अखेर उद्योगविनिमय केंद्रांतील नोकरी शोधणाऱ्यांच्या यादींवर ४,३३,१११ नांवें होतीं. १९५८ अखेर ही संख्या ३,६४,३९२ इतकी होती. नोकरी शोधणारे बहुतेक मॅट्रिक अगर अधिक शिकलेले होते व शक्य तर कारकुनी पेशाची नोकरी करण्याकडे त्यांचा कल दिसून आला. एकूण संख्येपैकीं ३९,६४१ उमेदवार पदवीधर होते.

**डांगी शेतकऱ्यांना कर्जमाफी**—मुंबई सरकारनें डांगमधील आदिवासी शेतकऱ्यांना बैल, बीं-बियाणें व शेतीचीं अवजारें विकत घेण्यासाठी १९३४ सालीं तगाई कर्जें दिलीं होतीं. नव्यानें स्थापन करण्यांत आलेल्या गुजरात राज्यानें शेतकऱ्यांना हीं कर्जें माफ केलीं आहेत. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठी ही माफी देण्यांत आली आहे.

**कुत्र्यांच्या निर्यातीनें प्राप्ति**—पाकिस्तान सरकार भुरटी कुत्रीं पकडून तीं कोरिआस निर्यात करण्याचा विचार करीत आहे. कोरिआंत कुत्र्याच्या मांसापासून बनविलेली कढी फार प्रिय आहे. कुत्र्याच्या ह्या संकल्पित निर्यातीमुळें पाकिस्तानांतील कुत्र्यांचा त्रास संपेल व शिवाय परदेशीय चलनाची प्राप्ति होईल.

**राजधानीच्या जागेची पाहणी**—गुजरातच्या नव्या राजधानीच्या आराखड्याचें काम पावसाळा संपल्यानंतर हातीं घेण्यांत येणार आहे. दरम्यान राजधानीसाठी पसंत करण्यांत आलेल्या २५ चौरस मैल जागेची पहाणी करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी गुजरात सरकारनें ४,००० रुपये मंजूर केले आहेत. नव्या राजधानीला 'गांधीनगर' असें संबोधण्यांत येणार आहे.

**फ्रान्स हैड्रोजन बाँब तयार करणार**—अटलांटिक संघटनेंतील देशांच्या लष्करी कवायतींत आतां फ्रेंच तुकड्या भाग घेणार आहेत. अणुयुद्धाच्या डावपेचांना उपयुक्त अशी कवाईत असते. फ्रान्सनें अणुबाँबचे स्फोट यशस्वी रीत्या केलेले आहेत. आतां फ्रान्स हैड्रोजन बाँब तयार करण्याच्या खटपटींत आहे.

**अरब प्रजासत्ताकाकडून तांदूळ**—गेल्या मार्च महिन्यांत भारत सरकारनें संयुक्त-अरब-प्रजासत्ताक राज्याकडून तांदूळ घेण्याचा करार केला होता. संकल्पित पुरवठ्यापैकी १ लाख टन तांदूळ लवकरच मुंबई बंदरांत येईल. सर्व तांदूळ जुलै महिन्याच्या अखेरीपर्यंत भारतांत येईल. तांदुळासाठी भारताला चार कोटी रुपये द्यावे लागतील.

**बंद गिरणी चालू झाली**—मध्यप्रदेशांतील राजनांदगांव येथील बंगाल-नागपूर ही कापडाची गिरणी गेले ८ महिने बंद होती. ती आतां चालू करण्यांत आली आहे. गिरणी बंद पडल्यावर ती १५ दिवसांत चालू करण्यांत आली नाहीं तर सरकार आपल्या ताब्यांत घेईल असा इषारा राज्य सरकारनें गेल्या मार्च महिन्यांत दिला होता. गिरणींत ३,००० मजूर काम करीत असत.

**मंत्र्यासाठीं खास अपवाद**—भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई १० जून रोजीं रशिआला जात आहेत. रशिआला जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला रोगांपासून बचाव करणारीं औषधें टोंचून घ्यावीं लागतात; नाहीं तर त्याला तात्पुरता अटकाव करतात. श्री. मोरारजी देसाई ह्यांच्या बाबतींत मात्र रशिआनें अपवाद केला आहे. कारण, ते लस टोंचण्याच्या विरुद्ध आहेत.

**पोलादाच्या छोट्या भट्ट्या**—पोलाद तयार करणाऱ्या आणखी सात छोट्या झोतभट्ट्या उभारण्यास भारत सरकारनें परवानगी दिली आहे. त्यापैकी २ मद्रास राज्यांत, ३ महाराष्ट्रांत, १ पश्चिम बंगालमध्यें व १ मध्यप्रदेशांत उभारण्यांत येणार आहे. मद्रास राज्यांत व ओरिसा राज्यांत अशा प्रकारची एक भट्टी ह्यापूर्वीच उत्पादन करूं लागली आहे.

**गहूं सांठविण्याचीं कोठारें**—मुंबई, मद्रास व कांडला ह्या ठिकाणीं आणि मुंबईजवळ बोरिवली येथें आणि कलकत्त्याजवळ कल्याणी येथें गव्हाचा सांठा करण्यासाठी सिमेंट-कॉंक्रीटचीं कोठारें बांधण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. प्रत्येक कोठारांत ५,००,००० टन गहूं सांठवितां येईल इतकीं मोठीं तीं असतील.

**जामनगर येथें औद्योगिक वसाहत**—जामनगर येथें छोट्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एक सहकारी औद्योगिक वसाहत स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या वसाहतीसाठी १० लाख रुपये खर्च येईल. जामनगर येथें ३०० छोटे उद्योगधंदे आहेत व त्यांची संख्या वसाहतीच्या स्थापनेनंतर वाढण्याचा संभव आहे.

**दंतवैद्यकाचीं केंद्रें**—निरनिराळ्या राज्यांतील जिल्हा इस्पितळांतून दंतवैद्यकाचीं १०७ केंद्रें स्थापन करण्यास भारत सरकारच्या आरोग्य खात्यानें मंजुरी दिली आहे. त्यापैकी ५८ केंद्रांची स्थापना आतांपर्यंत करण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अशीं २५० केंद्रें स्थापन करण्याची योजना समाविष्ट करण्यांत आलेली आहे.

## पूर्व जर्मनीच्या भरभराटीचें रहस्य

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची फाळणी झाली आणि पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी असे दोन तुकडे निर्माण करण्यांत आले. औद्योगिक दृष्ट्या पूर्व जर्मनीपेक्षा पश्चिम जर्मनी अधिक पुढारलेला होताच. नंतर कम्युनिस्ट विचारसरणीची लाट थोपविण्याच्या दृष्टीनें, पश्चिम युरोपीय राष्ट्रांनीं मार्शल मदत योजनेमार्फत इतर पाश्चिमात्त्य देशांबरोबरच पश्चिम जर्मनीलाहि मदत देण्यास सुरवात केली. त्यामुळें पश्चिम जर्मनी युद्धोत्तर आर्थिक अवनतींमधून लवकर सावरला. पूर्व जर्मनीला रशिआ-कडून अशी मदत मिळाली नाहीं. तथापि, गेल्या कांहीं वर्षांत पूर्व जर्मनीनें आश्चर्यकारक प्रगति केलेली आहे. पश्चिम जर्मनी-मधील आर्थिक परिस्थिति सुधारत चालल्यामुळें पूर्व जर्मनींतील बुद्धिजीवी तंत्रज्ञांचा फार मोठा वर्ग एकसारखा पश्चिम जर्मनींत स्थलांतर करीत होता. तरीसुद्धां पूर्व जर्मनी झपाट्यानें पुढें येत आहे. १९५१ सालीं पूर्व जर्मनीचें एकूण राष्ट्रीय उत्पादन पश्चिम जर्मनीच्या निम्मे होते. १९६० सालीं तें पश्चिम जर्मनीच्या ८० टक्के झालें असून शेतीच्या सामुदायीकरणाचा कार्यक्रम जर पूर्ण करण्यांत आला तर ते पश्चिम जर्मनीच्या बरोबरीनें होणें अगदीं शक्य आहे. कारखान्यांत स्वयंचलित यंत्रसामग्री बसविण्यांत आल्यामुळें पूर्व जर्मनीला ही प्रगति करतां आली. एका अर्थानें कुशल कामगारांचें व तंत्रज्ञांचें स्थलांतर पूर्व जर्मनीच्या पथ्यावरच पडलें. कारण, त्यामुळें स्वयंचलित यंत्रें बसविण्याचा कार्यक्रम पार पाडावाच लागला. आतां पूर्व जर्मनींतून पश्चिम जर्मनींत पळून जाणाऱ्या लोकांची संख्या घटत असून उलटा प्रवाह सुरू झाला आहे !

## महाराष्ट्र राज्यांतील हौशी प्रवासाचा धंदा

महाराष्ट्र राज्यांत हौशीच्या प्रवासाला उत्तेजन देऊन त्यांचा विश्वास घडवून आणण्यासाठी एक संचालक-मंडळ स्थापन करण्याचा विचार सरकार करीत आहे. ह्या संबंधींची योजना तयार झाली म्हणजे सरकार संबंधित बिनसरकारी संघटनांचें सहकार्य घेणार आहे. ह्या विषयासंबंधीं बोलतांना राज्याचे आरोग्य-मंत्री श्री. तल्यारखान म्हणाले कीं, भारतांत प्रवाशांना आकर्षित करण्यासारखीं पुष्कळ ठिकाणें आहेत. खरें म्हणजे हौशी प्रवाशांच्या दृष्टीनें भारत हें नंदनवनच आहे. भारतांत इतिहास-कालीन स्मारकें भरपूर आहेत. त्याचप्रमाणें निसर्ग सौंदर्यानें नटलेलीं ठिकाणेंहि पुष्कळ आहेत. ह्या रम्य स्थळांचा उपयोग करून घेतला तर भारताला लक्षावधि रुपयांचें परदेशीय चलन मिळूं शकेल. भारत स्वतंत्र झाल्यापासून ह्या धंद्याकडे सरकारनें लक्ष द्यावयास सुरुवात केली. तेव्हांपासून त्याची चांगली प्रगति झालेली आहे. परदेशीय चलन मिळविण्याच्या बाबतींत हौशीच्या प्रवासाच्या धंद्याचा अनुक्रम ७ वा लागतो. दरसाल निरनिराळ्या १५ देशांतून भारतांत सुमारें ९०,००० हौशी प्रवासी येतात व त्यांच्यापासून भारताला १७,५०,००,००० रुपयांचें परदेशीय चलन मिळतें. ह्या धंद्याच्या महत्त्वाकडे भारताचें लक्ष वेधलें गेलेलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. तरीपण इतर देशांशीं तुलना करतां भारताची ह्या बाबतची प्रगति बेताचीच आहे असें म्हणावें लागतें. महाराष्ट्र-राज्य सरकारनें कमी उत्पन्न असलेल्या लोकांच्यासाठी राज्यांत ११ ठिकाणीं विश्रांतिस्थानें स्थापन केलेलीं आहेत. त्याचा फायदा सुमारें २,००० लोकांनीं घेतला. त्यावरून हिंडण्याफिरण्याची हौस लोकांत वाढत असल्याचें दिसून येतें.

## स्टेट बँकेच्या निष्ठावंत नोकरांना बक्षिसें कां दिलीं ?

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नोकरवर्गाच्या २१ दिवसांच्या संपांत जे नोकर सामील झाले नाहींत अशांना त्या बँकेनें प्रत्येकी १०० रु. देणगीदाखल दिले, ह्याबद्दल पाटण्याच्या स्टेट बँक ऑफ इंडिआ स्टाफ असोसिएशननें बँकेच्या चालकांचा निषेध करणारा ठराव मंजूर केला आहे. संप करण्याचा कायदेशीर अधिकार असणाऱ्या कामगार संघटनांची एकजूट मोडण्यांत चालकांच्या ह्या कृत्याची परिणति होण्याचा संभव आहे, असें ह्या ठरावांत म्हटलें आहे. ह्यासंबंधीं स्टेट बँकेचें म्हणणें असें कीं संपामुळें निर्माण झालेल्या बिकट परिस्थितीमध्यें ज्यांनीं विशेष कामाचा भार सहन केला, त्यांच्याबद्दल जाणीव दाखविण्यासाठी बँकेनें ही योजना केली. कनिष्ठ नोकरांना ५० रु. चे बक्षिसाचे रोखे, कारकून वगैरेंना १०० रु. चे बक्षिसाचे रोखे आणि इतरांना व अधिकाऱ्यांना सुमारें १०० रु. च्या फाउंटनपेन किंवा ब्रीफकेस ह्यासारख्या वस्तू देण्यांत आल्या. संप संपल्यावर कितीतरी दिवसांनीं ही जाणीव दाखविण्यांत आली; संप मोडण्यासाठी नव्हे; असें बँकेनें स्पष्ट केलें आहे.

## जॉन डी. रॉकफेलर (ज्यु.) चा मृत्यु

सुप्रसिद्ध अमेरिकन नवकोटनारायण उद्योगपति मि. जॉन डी. रॉकफेलर ह्यांचा एकुलता एक मुलगा मि. जॉन डी. रॉकफेलर (ज्युनियर) हे वयाच्या ८६ व्या वर्षी दि. ११ मे रोजीं टस्कन (ॲरिझोना, यु. स्टे.) येथें मृत्यु पावले. बापलेकांनीं मिळून आतांपर्यंत सुमारें ५०० कोटी रु. धर्मादाय दिले आहेत. न्यूयॉर्क येथें ज्या जागेवर संयुक्त राष्ट्रसंघाची मध्यवर्ती इमारत उभी आहे, ती जागा रॉकफेलरचीच देणगी आहे.

## बँकांचीं कर्जें आंखडती घेणार

पैशाला कमी मागणी असण्याच्या येत्या हंगामांत, शेड्यूल्ड बँकांनीं आपलीं कर्जें सुमारें १०० कोटी रुपयांनीं कमी करावीत, अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा आहे. त्यानंतरच्या मोसमासाठी शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या कर्जविषयक कार्यक्रमाची आंखणी करतांना रिझर्व्ह बँकेवर विशेष अवलंबून राहूं नये. येत्या कांहीं महिन्यांत बिलमार्केट योजनेखालील कर्जें २५ ते ३० कोटी रुपयांनीं कमी करण्यांत यावयाचीं आहेत.

## श्री. लालवाणी, मुंबईच्या कॉमर्स कॉलेजच्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकीं

"'अर्थ'च्या दि. ११ चे अंकांत बँक ऑफ इंडिया लि. चे जनरल मॅनेजर, श्री. लालवाणी, ह्यांच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध झाली आहे. श्री. लालवाणी हे १९१७ मध्यें मुंबई विद्यापीठाची बी. कॉम्. परीक्षा पास झाले. मुंबईत कॉमर्स कॉलेज स्थापन झालें, त्यावेळीं श्री. लालवाणी हे पहिल्या बॅचमधील विद्यार्थी होते. ते बी. ए. झाल्याचें चुकून प्रसिद्ध झालें आहे." असें हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इनव्हेस्टमेंट लि. चे श्री. जी. ए. भोंसुले, बी. कॉम्., हे कळवितात.

## नवीं वजनें–मापें

सोमवार, दि. २३ रोजीं रात्रीं ९–२० वाजतां पुणें नभोवाणीवरून 'नगरसभे' मध्यें श्री. श्री. वा. काळे, ह्यांचा 'नवी वजनें–मापें' ह्यावरील कार्यक्रम ध्वनिक्षेपित होईल.

# अर्थ

बुधवार, ता. १८ मे, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## कागदाच्या कारखान्यांना भरपूर वाव

मुंबई येथील रोटरी क्लबमध्यें श्री. बी. डी. सोमाणी ह्यांचे कागदाच्या उद्योगधंद्यासंबंधीं व्याख्यान झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, साखरेच्या कारखान्यांतून उसाचीं जीं चिपाडें निघतात त्यांचा उपयोग करून कागदाचे कारखाने काढण्यास भारतांत भरपूर वाव आहे. भारतामधील साखर कारखान्यांच्या संख्येंत वाढ होत चाललेली आहे. अर्थातच कागदाच्या कारखान्यासाठी लागणारीं उसाचीं चिपाडें भरपूर प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतील. ह्या कच्च्या मालाचा उपयोग करून घेतला तर देशांतील कागदाच्या मागणींपैकी बरीच मोठी मागणी देशांतर्गत उत्पादनानेंच भागवितां येण्यासारखी आहे. उसाच्या चिपाडांचा उपयोग करून १॥ लाख टन कागद निर्माण करतां येईल असा अंदाज आहे. गेल्या दहा वर्षांत भारतामधील कागदाचें उत्पादन तिपटीनें वाढलेलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कागदाच्या उत्पादनाचें लक्ष्य ९ लाख टन ठरविण्यांत आलें आहे. ते गांठतां येणें मुळींच अशक्य नाहीं. भारतामधील कागदाचें दरडोई उत्पादन युरोप अगर जपान-मधील दरडोई उत्पादनाच्या मानानें फार अल्प आहे. अर्थातच कागदाच्या खपाची भारतामधील बाजारपेठ विस्तार पावत जाणारी आहे. निरनिराळया प्रकारचा कागद निर्माण करण्यास भारतांत अजून पुष्कळ वाव आहे. भारत सरकारनें नेमलेल्या डेव्हलपमेंट कौन्सिलनें कागदाच्या धंद्याबाबत चांगलें धोरण स्वीकारलेलें आहे. त्याचप्रमाणें भारत सरकारनें अलीकडे कागद तयार करणाऱ्या सहा नव्या गिरण्यांना मंजुरी दिली आहे. कागदाच्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आतांपर्यंत आयात करावी लागत असे. पण आतां परिस्थिति पालटत आहे.

---

## छोट्या उद्योगधंद्याच्या राष्ट्रीय कॉर्पोरेशनचा वार्षिक अहवाल

छोट्या उद्योगधंद्याच्या राष्ट्रीय कॉर्पोरेशननें छोट्या उद्योग-धंद्यांत तयार होणाऱ्या मालासाठी १९५९–६० मध्यें २·६५ कोटी रुपये किंमतीच्या मालासाठी सरकारकडून कंत्राटें मिळविलीं असें कॉर्पोरेशनच्या या वर्षाच्या वार्षिक अहवाला-वरून दिसून येतें. १९५५–५६ मध्यें ५ लक्ष रुपये किंमतीच्या मालासाठी कंत्राटें मिळालीं होतीं. हप्तेबंदीनें यंत्रें पुरविण्याच्या योजनेबाबतचा उल्लेख करून अहवालांत म्हटलें आहे कीं, या वर्षीहि ही योजना प्रगतिपथावर होती व एकूण १·२७ कोटी रुपये किंमतीचीं यंत्रें छोट्या प्रमाणावरील कारखान्यांना पुरविण्यांत आलीं. या योजनेनुसार यंत्रें पुरविण्यासाठी अवलंबि-ण्यांत येणारी पद्धति अधिक सैल करण्यांत आली हें ह्या वर्षीचें एक वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल. आनुषंगिक उद्योगधंदे स्थापन करणें आणि अशा धंद्यांचा विकास करणें ह्या बाबतींतहि प्रगति झाली असल्याचें ह्या अहवालांत म्हटलें आहे. छोट्या उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी कॉर्पोरेशननें केलेल्या साह्याचा अहवालांत उल्लेख केला असून, कॉर्पोरेशननें चालविलेल्या ९ विक्री केन्द्रांनीं १९५९-६० मध्यें १६ लक्ष रुपये किंमतीचा माल विकला. निर्यातीच्या बाबतींतहि छोट्या उद्योगधंद्यांना कॉर्पोरेशननें साह्य केलें. रशिआ, पोलंड, पूर्व जर्मनी आणि बल्गेरिया यांसारख्या देशांकडे छोट्या उद्योगधंद्यांत तयार झालेले ६ लाखांहून अधिक पादत्राणांचे जोड निर्यात केले. शिक्षण आणि उत्पादन केन्द्रें स्थापन करण्याच्या बाबतींतहि प्रगति झाल्याचें अहवालांत म्हटलें आहे.

---

## कापड गिरण्यांच्या यंत्रसामग्रीचा कारखाना

भारत सरकारनें कापडाच्या गिरण्यांमधील यंत्रसामग्रीचें आधुनिकीकरण करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. बऱ्याच कापड गिरण्यांमधील यंत्रसामुग्री जुनीपुराणी झाली असल्यानें ती योग्य तऱ्हेनें काम देत नाहींशी झाली आहे. शिवाय, कापडाच्या निर्यात व्यापाराच्या दृष्टीनेंहि गिरण्यांतील यंत्रसामग्री नवी बसविणें अगत्याचें आहे. कारण, परदेशीय बाजारपेठांत भारताच्या कापडाचा एरव्ही टिकाव लागणार नाहीं. सध्यां तरी कापड गिरण्यांना लागणारी अद्यावत् पद्धतीची यंत्रसामग्री परदेशांतून आयात करावी लागते, आणि त्यासाठी मध्यवर्ती सरकारला कोट्यावधी रुपये किंमतीचे आयात परवाने दरसाल द्यावे लागतात. अशा तऱ्हेनें यंत्रसामग्री आयात करण्यासाठी दुर्मीळ असें परदेशीय चलन तर मोठ्या प्रमाणावर द्यावें लागतेच. पण त्याचबरोबर ह्या बाबतींत परदेशांवर अवलंबून राहण्याची आपत्तीहि सोसावी लागते. कापडाच्या गिरण्यांच्या यंत्रसामग्री-च्या बाबतींत देश स्वावलंबी व्हावा म्हणून ती यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखानाच काढण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्या कामीं कापड गिरण्यांच्या मालकांचेंहि सहकार्य सरकार घेत आहे. गिरणीमालकांच्या सहकार्यानें सरकार लवकरच कारखान्याची एखादी योजनाहि तयार करण्याचा संभव आहे. बहुधा हा संकल्पित कारखाना गुजरात राज्यांत निघेल. कारखान्यासाठी प्रारंभीं १० कोटी रुपयांचें भांडवल लागेल. कारखाना स्थापन करण्यासाठी भारत सरकारकडून सर्व प्रकारचें साह्य मिळणार आहे. कारखाना स्थापन झाल्यावर कोट्यवधी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल.

---

**चुनखडीच्या खाणीचें यांत्रिकीकरण**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यासाठी लागणारी चुनखडी पुरविणाऱ्या खाणींचें यांत्रिकीकरण लवकरच पूर्ण होईल. यांत्रिकीकरणासाठी लागणारी यंत्रसामग्री रशिआनें पुरविली आहे. यांत्रिकीकरण करण्यांत आलेली ही भारतामधील पहिलीच खाण होईल. भिलईच्या कारखान्याला खाणींतून दरसाल ७,५०,००० टन चुनखडी पुरविण्यांत येईल.

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1958 Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 50 00,000 | 1,00,000 Shares of Rs. 50/- each ... | | 50,00,000—00 |
| | *Issued and Subscribed Capital:* | | |
| 32,00,000 | 64,000 Shares of Rs. 50/- each ... | | 32,00,000—00 |
| | *Called and Paid-up Capital:* | | |
| 25,60,000 | 64,000 Shares of Rs. 50/- each fully paid up ... | 32,00,000—00 | |
| | *Less*: Call in Arrears : | | |
| Nil | From Directors Nil | | |
| 37,660 | From others Rs. 31,850 00 | 31,850—00 | 31,68,150—00 |
| 25,22,340 | | | |
| 2,97,660 | Calls in Advance ... | | Nil |
| | **2. Reserve Fund & Other Reserves** | | |
| 11,50,000 | *As per last Balance Sheet ... | 13,00,000—00 | |
| 1,50,000 | Additions during the year ... | 1,60,000—00 | 14,60,000—00 |
| 13,00,000 | *( Includes Rs. 2,52,995/- received as premiums on issue of shares in past years ) ... | | |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 3,84,60,602 | Fixed Deposits and Cash Certificates ... | 5,31,48,081—17 | |
| 3,40,44,934 | Savings Bank Deposits ... | 4,18,03,160—59 | |
| 3,30,83,588 | Current accounts, Contingency accounts etc. ... | 3,76,04,897—31 | 13,25,56,139—07 |
| 10,55,89,124 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | ( i ) In India. ... | Nil | |
| Nil | (ii) Outside India. ... | Nil | Nil |
| | *Particulars*: | | |
| | ( i ) Secured ... | Nil | |
| | (ii) Unsecured. ... | Nil | |
| 12,94,581 | **5. Bills Payable** ... | | 17,52,310—43 |
| | **6. Bills for Collection, ( being Bills Receivable as per contra )** | | |
| 93,83,278 | ( i ) Payable in India ... | 1,07,61,112—44 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 1,07,61,112—44 |
| | **7. Other Liabilities:** | | |
| 16,637 | Unclaimed Dividends ... | 16,072—67 | |
| 191 | Rebate on Bills Discounted ... | 111—76 | |
| 16,98,021 | Branch Adjustments ... | 25,66,041—03 | 25,82,225—46 |
| 17,14,849 | | | |
| 8,28,508 | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra:** | | 41,41,478—69 |
| | ( Inculdes Rs. 6,22,655/- in respect of guarantees given to Government Departments, secured againt part of the Bank's Investments ) | | |
| | **9. Profit and Loss:** | | |
| 1,40,961 | Profit as per last Balance Sheet ... | 1,92,533—75 | |
| | *Less* : Appropriations : | | |
| 1,04,863 | Dividend ... | 1,53,194—53 | |
| 36,098 | | 39,339—22 | |
| | *Add* : Profit for the year ( subject to taxation ) | | |
| 5,56,436 | brought from the Profit and Loss account ... | 7,72,027—97 | |
| 5,92,534 | | 8,11,367—19 | |
| 1,50,000 | *Less* : Transferred to Rsserve Fund Rs. 1,60,000—00 | | |
| | Provision for Income tax and | | |
| 2,50,000 | Super-tax Rs. 3,40,000—00 | 5,00,000—00 | 3,11,367—19 |
| 1,92,534 | | | |
| | Carried over ... | | 15,67,32,783—28 |

# MAHARASHTRA, LIMITED, POONA.

## AT 31st DECEMBER 1959.

| 31-12-1958 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,14,08,796 | **1. Cash** In hand, with Reserve Bank and State Bank of India. (Including Foreign Currency Notes) ... | | 1,61,04,026—15 |
| | **2. Balances with other Banks: (In Current Account)** | | |
| 8,75,083 | (i) In India ... | 10,45,199—54 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 10,45,199—54 |
| 76,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 53,00,000—00 |
| | **4. Investments :** Securities—At or below redemption value: | | |
| 4,61,24,491 | (i) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. (Out of these, securities of the face value of Rs. 1,82,88,000/- are with Banks for over-draft and other arrangement). (Market value Rs. 6,32,37,535-80) (Face value Rs. 6,44,36,200-00) ... | 6,22,25,028—75 | |
| 8,82,522 | (ii) Shares : At or below cost. Ordinary shares (fully paid-up) (Market value Rs. 2,30,183-25) Rs. 2,23,132-02 Preference shares (fully paid-up) (Market value Rs. 11,40,977-50) Rs. 11,36,482-55 Ordinary shares (partly paid-up) (Market value Rs. 4,34,129-50) Rs. 4,32,868-75 | 17,92,483—32 | |
| 11,32,820 | (iii) Debentures or Bonds : At cost (Market value Rs. 13,63,107-50) ... | 12,46,635—00 | |
| Nil | (iv) Gold ... | Nil | 6,52,64,147—07 |
| 4,81,39,833 | | | |
| | **5. Advances :** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the auditors) ... | | |
| | (1) *Loans, Cash Credits, Over-drafts etc.* | | |
| 4,06,92,788 | (i) In India Rs. 4,86,40,880-11 | | |
| Nil | (ii) Outside India Rs. Nil | 4,86,40,880—11 | |
| | (2) *Bills, Discounted and Purchased* (Excluding Treasury Bills of the Central and State Governments.) | | |
| 13,56,007 | (i) Payable In India Rs. 20,25,761-84 | | |
| Nil | (ii) Payable outside India Rs. Nil | 20,25,761—84 | 5,06,66,641—95 |
| | **Particulars of Advances :—** | | |
| 3,52,67,171 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 4,07,13,158—58 | |
| 30,61,312 | (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 41,46,404—27 | |
| 37,20,312 | (iii) Debts considered good, secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | 58,07,079—10 | |
| Nil | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. | Nil | |
| 4,20,48,795 | | 5,06,66,641—95 | |
| 6,88,170 | (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 4,98,109—19 | |
| 20,20,101 | (vi) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, partners or Managing Agents, or in the case of private companies as Members ... | 30,77,336—60 | |
| 6,90,954 | (vii) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 7,46,478—38 | |
| | Carried Over ... | | 13,83,80,014—71 |

# THE BANK OF

## BALANCE SHEET AS

| 31-12-1958 Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 15,67,32,783—28 |
| | 10. Contingent Liabilities : | | |
| 1,54,050 | ( i ) On partly paid shares in joint stock companies held by the Bank as investments including shares of the subsidiary company ... | 2,78,550—00 | |
| Nil | (ii) Guarantees given on behalf of customers ... | 66,500—00 | |
| | *Note* :—Provision to the full extent in respect of future gratuity to the staff has not been made, the liabilty for which has not been ascertained. | | |
| 12,31,22,274 | Total Rs. ... | | 15,67,32,783—28 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1959

| 31-12-1958 Rs. | EXPENDITURE | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 22,23,035 | 1. Interest paid on Deposits, Borrowings etc. ... | | 28,73,801—76 |
| | 2. Salaries, Allowances, Provident Fund and Gratuity Fund : | | |
| 25,500 | Manager ... | 26,100—00 | |
| 11,86,710 | Others ... | 15,47,006—85 | 15,73,106—85 |
| | 3. Directors' and Local Committee Members' Fees and | | |
| 10,750 | Allowances ... | | 14,850—00 |
| 1,35,602 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 1,71,528—17 |
| 5,490 | 5. Law Charges. ... | | 5,903—33 |
| 95,059 | 6. Postage, Telegrams, Stamps and Telephone ... | | 1,15,854—80 |
| 3,300 | 7. Auditors' fees including travelling expenses ... | | 4,000—00 |
| | 8. Depreciation, Development Rebate on and Repairs | | |
| 85,287 | to the Baking Company's Property. ... | | 95,799—93 |
| 1,25,015 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 2,06,966—21 |
| Nil | 10. Loss from sale of or dealings with Non-Banking assets | | Nil |
| | 11. Other Expenditure : | | |
| 72,420 | Sundry charges ... | 1,02,391—26 | |
| 31,670 | Travelling and Conveyance ... | 36,549—78 | 1,38,941—04 |
| | 12. Balance of profit ( subject to taxation ) carried to | | |
| 5,56,436 | Balance Sheet ... | | 7,72,027—97 |
| 45,56,274 | Total Rs. ... | | 59,72,780—06 |

| 31-12-1958 Rs. | INCOME ( Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions. ). | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 39,57,131 | 1. Interest and Discount. ... | | 52,09,791—93 |
| 5,25,932 | 2. Commission, Exchange, Brokerage. ... | | 6,84,724—89 |
| 16,983 | 3. Rent ( Less taxes and other charges ) ... | | 16,652—62 |
| | 4. Net Profit on sale of Investments, Gold and Silver, Land, premises and other Assets ( not credited to | | |
| Nil | Reserve or any particular Fund or Account. ) ... | | Nil |
| | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold and Silver, Land, Premises and other Assets ( not credited to Reserve or any particular Fund or | | |
| Nil | Account. ) ... | | Nil |
| | 6. Income from Non-Banking assets and Profit from | | |
| Nil | sale of or dealing with such assets ... | | Nil |
| | 7. Other Receipts : | | |
| 427 | Transfer fees ... | 463—94 | |
| 55,801 | Lockers rental ... | 61,146—68 | 61,610—62 |
| 45,56,274 | Total Rs. ... | | 59,72,780—06 |

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bank of Maharashtra, Limited as at 31st December, 1959 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of 10 branches audited by other Auditors and the unaudited returns from 41 other branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to Sub-section (1) and (2) of Section 211 and Sub-section (5) of Section 211 and Section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are, therefore, drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949,

# MAHARASHTRA, LIMITED, POONA.

**AT 31st DECEMBER 1959.**

| 31-12-1958 Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | Brought Forward ... | | 13,83,80,014—71 |
| | (viii) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case | | |
| 32,58,457 | of private Companies, as Members. ... | 51,12,861—31 | |
| 5,17,163 | (ix) Due from Banking Companies ... | 23,191—74 | |
| | **6. Bills Receivable. Being Bills for Collection as per contra:** | | |
| 93,83,278 | (i) Payable in India ... | 1,07,61,112—44 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 1,07,61,112—44 |
| | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** | | |
| 8,28,508 | ... | | 41,41,478—69 |
| | **8. Bank's Premises :** Less depreciation. | | |
| | Cost as at 31st December, 1958 ... | 8,69,854—95 | |
| | Additions during the year ... | 99,640—00 | |
| | | 9,69,494—95 | |
| 7,68,370 | Less : Total Depreciation to-date ... | 1,21,484—95 | 8,48,010—00 |
| | **9. Furniture, Fixtures, Safe Deposit Vault etc. :** | | |
| | Less Depreciation : | | |
| | Cost as at 31st December, 1958 ... | 8,90,661—82 | |
| | Additions during the year. ... | 1,89,866—57 | |
| | | 10,80,528—39 | |
| 6,09,277 | Less : Total Depreciation to date ... | 3,42,908—89 | 7,37,619—50 |
| | **10. Other Assets Including Silver.** | | |
| 3,988 | (1) Stamps on hand ... | 8,033—41 | |
| 6,98,980 | (2) Tax paid in advance and at source ... | 10,54,406—45 | |
| 3,65,383 | (3) Interest accrued on Investments (less tax) ... | 3,95,968—80 | |
| 2,31,983 | (4) Sundry advances ... | 2,46,139—28 | |
| | (5) Shares of the Maharashtra Executor and | | |
| 1,21,000 | Trustee Co. Private Limited (Partly paid-up)... | 1,21,000—00 | 18,25,547—94 |
| 14,21,334 | | | |
| | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | |
| 39,000 | (Estimated Realisable value Rs. 39,000/-) ... | | 39,000—00 |
| 12,31,22,274 | Total Rs. ... | | 15,67,32,783—28 |

We report that :-(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory. (b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank. (c) In our opinion, proper books of account as required by law have been kept by Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank. (d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns. (e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies and on such basis Balance Sheet gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December 1959, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Poona City, 5th February, 1960.

**KULKARNI & KHANOLKAR**
*Chartered Accountants.*

**G. D. APTE & Co.**
*Chartered Accountants.*

## STATEMENT PURSUANT TO SECTION 212 OF THE COMPANIES ACT, 1956.

(a) The Bank's interest in its Subsidiary, The Maharashtra Executor and Trustee Company Private Ltd., as at 31st December, 1959, comprised 2,420 shares of the face value of Rs. 100/- each of which Rs. 50/- has been paid up.

(b) The Profits of the Subsidiary Company for the year ended 31st December, 1958, have been included in the item 'Interest and Discount' in Bank's Profit and Loss account as at 31st December 1959, to the extent of the dividendes amounting to Rs. 2,420/- declared and paid by the Subsidiary for the year ended 31st December 1958 in respect of the Bank's share-holdings. The undistributed balance of profit of the Subsidiary amounting to Rs. 1,358-17 nP. has been carried forward in the accounts of the Subsidiary.

(c) The net aggregate amount of Rs 23,055-31 nP. received as dividends from the Subsidiary Company for its previous financial years, since its inception as a Subsidiary Company have been dealt with in the Profit and Loss Account of the Bank in the relevant years.

Poona City, 5th February, 1960.

C. V. Joag, *Manager*
V. P. Varde, *Chairman.*
P. V. Agashe, *Accountant.*

N. G. Pawar, B. M. Gupte, M. B. Jambhekar, J. K. Rege, D. K. Sathe, M. V. Shah, R. B. Banthia, M. S. Parkhe — *Directors.*

Shri F. D. Pudumjee and Shri V. S. Shirgaonkar being absent, did not sign.

# THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED, POONA 2

## 24TH REPORT OF THE DIRECTORS

*[ 24th Report of the Directors to be submitted to the share-holders at the Annual General Meeting to be held at the registered office of the Bank, Maharashtra Bank Building, 1177 Budhwar Peth, Poona City on Tuesday, the 15th March, 1960 at 4 P. M. (I. S. T.) ]*

Your Directors beg to submit the Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December, 1959, duly certified by the Auditors.

It will be seen that the transactions of the Bank during the year under report, after meeting all expenses, after providing and transferring Rs. 1,00,000/- to the Staff Gratuity Fund and Rs. 1,05,000/- for payment of Bonus to Staff and after making usual and necessary provisions, resulted in a net

| | | |
|---|---|---|
| profit of ... ... ... | | Rs. 7,72,027-97. |
| After transferring out of the current year's profit: | | |
| To Reserve Fund... | Rs. 1,60,000-00 | |
| To Provision for Taxation ... | Rs. 3,40,000-00 | Rs. 5,00,000-00 |
| there remains a balance of... | | Rs. 2,72,027-97 |
| Adding thereto the balance brought forward from the previous year, ... ... | | Rs. 39,339-22 |
| the amount available for distribution is ... ... | | Rs. 3,11,367-19 |
| which your Directors recommend be appropriated as under: | | |
| To pay dividend on 64,000 shares for the year ended 31st December, 1959 at 9% P. A. subject to deduction of tax, on the paid up amount of the shares, pro-rata. ... | | Rs. 2,68,765-12. |
| To Carry forward to next year's account ... | | Rs. 42,602-07 |
| ... | | Rs. 3,11,367-19 |

The business of the Bank during the year under report has made a satisfactory progress.

The remaining two Calls in respect of share capital were made during the year under report. The paid up capital at the end of the year stood at Rs. 31,68,150/-. Only an amount of Rs. 31,850/- remains to be received from some share-holders, who are requested to pay up these amounts early.

Seven branches of our Bank were opened at Khamgaon, Yeotmal, Bombay Central and Worli (Bombay), University (Poona), Barsi and Akluj, during the year under report, taking the total number of branches to 51.

With the exception of a few, all the districts in Maharastra now have a branch of our Bank.

The Directors thank the members of the Local Advisory Committees at the branches for their guidance to our Agents.

The Balance Sheet, Profit and Loss Account and Report of Directors of the Trustee Company are attached.

During the year—

(1) Shri J. K. Rege of M/s Hardcastle Waud & Co., Private Ltd., Bombay.

(2) Shri V. S. Shirgaonkar of Ugar Sugar Work Ltd., Sangli and

(3) Shri R.B. Banthia, Land-lord and Banker of Panvel were co-opted as Directors under Article 90 of the Articles of Association. They retire on the date of the meeting, but offer themselves for re-election.

Under Article 99 of the Articles of Association Shri N. G. Pawar, Shri M. V. Shah and Shri B. M. Gupte retire by rotation. They offer themselves for re-election.

You are requested to appoint Auditors for the current year and fix their remuneration.

For and on behalf of
the Board of Directors

POONA CITY, C. V. Joag V. P. Varde
5th February, 1960. *Manager.* *Chairman.*

**ब्रिटनमध्यें दशमानपद्धति**—ब्रिटनमध्यें चलनाची दशमान पद्धति असावी कीं नाहीं आणि वजनामापाच्या बाबतींत मेट्रिक पद्धति असावी कीं नाहीं, ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी सरकारनें दोन कमिट्या नेमल्या होत्या. लोकांना ह्या पद्धति पाहिजे असतील तर सरकारनें असा बदल घडवून आणण्याची तयारी लवकर करावी, अशी शिफारस कमिट्यांनीं केली आहे.

**पोरबंदरला विमानाची सोय**—नव्या गुजरात राज्याची स्थापना झाल्यामुळें पोरबंदर शहर हवाई मार्गानें राजकोट व अहमदाबाद ह्यांना जोडण्यांत येण्याची शक्यता आहे. कांहीं दिवस नवा मार्ग प्रायोगिक म्हणून चालविण्यांत येईल व पुरेशी वाहतूक मिळाल्यास तो कायम करण्यांत येईल. ह्या मार्गाची मागणी पोरबंदर चेंबर ऑफ कॉमर्सनें केली होती.

**पुण्याजवळ घड्याळांचा कारखाना**—फ्रेंच कारखानदारांच्या साह्यानें काढण्यांत येणारा भारतामधील घड्याळांचा दुसरा कारखाना पुण्याजवळ निघण्याचा संभव आहे. ह्या कारखान्याच्या यंत्रसामग्रीसाठी २ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची सोय करण्यांत आली आहे. कारखान्यांत दरसाल ३५,००० ते ५०,००० मनगटी घड्याळें तयार करण्यांत येतील.

**महाभारताचें भाषांतर**—मध्यवर्ती सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्याचे मंत्री श्री. हुमायून कबीर ह्यांनीं लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना अशी माहिती सांगितली कीं, महाभारताचें आसामी भाषेंत भाषांतर करण्यासाठी सरकारनें १० हजार रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.